सत्यमेव जयते

# विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

(२०१५-२०१६)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**जिल्हा परिषद, नाशिक यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा**

# दहावा अहवाल

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक ऑगस्ट, २०१६ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई

**जुलै-ऑगस्ट, २०१६**

**विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती**

**(२०१५-२०१६)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**जिल्हा परिषद, नाशिक यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा**

# दहावा अहवाल

एचबी १०३७—१

**विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती**
**(२०१५-२०१६)**

**समिती प्रमुख**

(१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(४) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.
(५) श्री. महेश चौघुले, वि.स.स.
(६) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.
(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(८) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.
(९) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.
(१०) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(११) श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, वि.स.स.
*(१२) रिक्त
(१३) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.
(१४) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.
(१५) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक १ मे, २०१५ व दिनांक २१ मे, २०१५ रोजी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती नामनिर्देशित केली आहे.

*श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांची दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्रिमंडळात "मंत्री" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.





**अनुक्रमणिका**


| अ.क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | (पाच) |
| २ | अहवाल | १ |
| ३ | परिशिष्ट " एक "(जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून भेटीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती) | १३ |
| ४ | परिशिष्ट " दोन " (जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून साक्षीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती) | २५ |
| ५ | परिशिष्ट " तीन " (समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त) | २९ |

## प्रस्तावना

मी, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा **दहावा अहवाल** सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ या वर्षासाठी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती दिनांक २२ मे २०१५ रोजी गठीत झाली.

विधानसभा नियमावलीतील नियम २३८ अन्वये या समितीकडे खालीलप्रमाणे कामे सोपविण्यात आली आहेत :-

(एक) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासाठी असलेल्या राज्य शासनाच्या विविध योजनांचे परीक्षण करणे आणि राज्य शासनाने, त्यासंबंधात काय उपाययोजना करावी या विषयाची माहिती दोन्ही सभागृहांना सादर करणे;

(दोन) राज्य शासनाने आपल्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदांवर (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सांविधिक आणि निमसरकारी संस्था यातील नेमणूका धरून) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे ;

(तीन) राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासंबंधातील सर्व बाबींवर सर्वसाधारणतः विचारविनिमय करणे आणि दोन्ही सभागृहांना त्याबाबतचा अहवाल देणे;

(चार) समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना माहिती देणे;

(पाच) सभागृहाने किंवा अध्यक्षांनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत केलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने जिल्हा परिषद, नाशिक यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसंदर्भात सदर कार्यालयांना दिनांक २४ जून, २०१५ रोजी भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. संबंधित कार्यालयाने समितीला प्रश्नावलीच्या संदर्भात पुरविलेल्या लेखी माहितीच्या आधारे व समितीने उक्त कार्यालयांना दिलेल्या भेटीच्या वेळी अधिकाऱ्यांनी समितीला दिलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग व प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांनी दिलेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने त्यासंदर्भातील आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.



अहवालातील परिशिष्ट "एक" व "दोन" मध्ये संबंधित विभागाकडून प्राप्त झालेली माहिती तसेच परिशिष्ट "तीन" मध्ये समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त समाविष्ट करण्यात आले आहे. समितीने दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी प्रारुप अहवालावर विचार करून तो संमत केला.

जिल्हा परिषद, नाशिक येथील संबंधित अधिकारी आणि मंत्रालयातील विभागाचे सचिव यांनी साक्षीच्या वेळी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहकार्य केल्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २८ जुलै, २०१६.

**बाळासाहेब सानप,**
समिती प्रमुख,
विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती.

## अहवाल

### जिल्हा परिषद, नाशिक

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीस प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २४ जून २०१५ रोजी जिल्हा परिषद, नाशिक यांच्या कार्यालयास भेट देऊन विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

नाशिक जिल्ह्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, नाशिक जिल्ह्यामध्ये एकूण १५ तालुके असून जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १५६४० चौ.कि.मी.आहे. नाशिक जिल्हा परिषद सदस्यांची एकूण संख्या ८८ असून त्यापैकी १५ सभासदांची सभापतीपदी निवड करण्यात आलेली आहे. जिल्ह्यामध्ये ३२०० मि.मी.इतका सर्वाधिक पाऊस पडणारे तालुके असून काही तालुके ३५० मि.मी. पाऊस पडणारेही आहेत. जिल्ह्यात एकूण १९०० गावे आहेत व १३७६ ग्राम पंचायती असून त्यामध्ये पेसा अंतर्गत ७ ब्लॉक असून त्या अंतर्गत ५६७ ग्रामपंचायती आहेत. जिल्हा परिषदेच्या एकूण ३३६१ प्राथमिक शाळा आहेत.

समितीने, नाशिक जिल्हा परिषदेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांसाठी असलेल्या वर्ग-१ ते वर्ग-४ मधील तांत्रिक/अतांत्रिक पदे सरळसेवा भरतीद्वारे भरण्यासाठी अवलंबिण्यात येत असलेल्या कार्यपद्धतीची माहिती देण्यास सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, नाशिक जिल्हा परिषदेतील वर्ग-१ व वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांची नेमणूक सरळसेवा भरतीने शासनातर्फे करण्यात येते. वर्ग-३ ची (गट-क) पदे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समितीच्या स्तरावरून व वर्ग-४ ची पदे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीच्या स्तरावरून भरण्यात येतात. दिनांक ५ जून २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार वर्ग-३ ची पदे भरताना २०० गुणांची लेखी परीक्षा घेऊन गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवड करण्यात येते.

समितीने, सरळसेवेने भरावयाच्या विस्तार अधिकारी पदाचा अनुशेष राहण्याची कारणे काय आहेत, सदरचे पद केव्हापासून रिक्त आहे, अशी विचारणा केली असता सदरचे पद हे विस्तार अधिकारी (सां) चे असून वरिष्ठ सहायक (सां) हे पद अस्तित्वात न राहिल्याने विस्तार अधिकारी (सां) हे पद पदोन्नतीने भरता येत नाही. त्यामुळे सदरील पद सरळसेवेने भरण्याची परवानगी मिळणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. याबाबतचा प्रस्ताव दीड वर्षापूर्वी शासनास सादर केला असून पाठपुराव्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत पत्र व्यवहार करण्यात येत आहे. संपूर्ण राज्याकरिता सदर पदाची नियमावली प्राप्त झाल्यानंतरच सदर पदाचा अनुशेष दूर करणे शक्य होईल, अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली.



समितीने, अनुकंपा तत्त्वावरील प्रतीक्षा यादीवर किती उमेदवार आहेत, प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची नेमणूक वेळेत होत नसल्यामुळे उमेदवारांची वयोमर्यादा उलटून जात असल्याने वेळेत पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली जाते, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, मागील काही वर्षे अनुकंपा तत्त्वावरील पदे भरण्यावर बंदी घालण्यात आली होती. सदर बंदी ऑक्टोबर, २०१३ नंतर शिथील करण्यात आल्यावर नाशिक जिल्ह्यामध्ये शिपायांची ३९ पदे आणि इतर ४२ अशी एकूण ८१ पदे भरण्यात आली असून आता अनुकंपा तत्त्वावर शिपाई संवर्गात पदे नाहीत.

समितीने मुलांना शिक्षणामध्ये प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा परिषदेने निधीची तरतूद केली आहे काय, याबाबत माहिती देण्यास सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेने मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी १० लाख रुपये निधीची तरतूद केली आहे. सकाळ, मराठा विकास मंडळ संस्था व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून एक प्रश्न मालिका सकाळ दैनिकामधून प्रकाशित करण्यात येत होती. त्यावर आधारित जिल्हा परिषद शाळांच्या १६७ केंद्रामधून एमपीएससी प्रमाणे परिक्षा घेण्यात आली व त्याचा निकाल जाहीर करण्यात आला. सदर परिक्षेत गुणवत्तेनुसार दैनिक सकाळ, मराठा विकास मंडळ व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून प्रत्येकी तीन मुलांना बक्षिस वितरण करण्यात येणार असून जिल्हास्तरावर विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व्याख्यान देण्यात येणार आहे असे विदित केले.

समितीने, खाजगी शाळेतील संस्था चालकांच्या आढावा बैठकीत अनुशेषाची माहिती घेण्यात आली आहे काय, याबाबत विचारणा केली असता शिक्षणाधिकाऱ्यांनी विदित केले की, गेल्या २-३ वर्षांपासून शिक्षक भरती प्रक्रिया बंद आहे. भरती प्रक्रिया बंद असल्याने पदे भरण्यास मान्यता देण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. तसेच, खाजगी शाळेतील प्रवेशाबाबत उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या गाईड लाईन्स असून त्यानुसार मुख्याध्यापक व प्राचार्यांना ती पदे भरण्याचा अधिकार आहे. खाजगी शाळांमधील प्रवेश, आरक्षण व मेरिट लिस्ट यासंदर्भात जिल्हा परिषदेमार्फत बैठक आयोजित करण्यात येत असते.

समितीने, यावर काही शिक्षण संस्था मनमानी पद्धतीने विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्यावेळी देणगीच्या नावाने पैसे घेऊन पालकांची पिळवणूक करीत असतात त्यासंबंधी वस्तुस्थिती काय आहे, सदर संस्थांची बिंदू नामावली तपासण्यात आली आहे काय, अशी विचारणा केली असता शिक्षणाधिकाऱ्यांनी विदित केले की, दिनांक २ मे, २०१२ पासून नवीन शाळांना मान्यता देण्यात आली नसल्याने या कालावधीमध्ये पदांना मान्यता देण्यात आलेली नाही. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून खाजगी शाळांची तपासणी करण्यात येत नाही. फक्त पदे भरण्याच्या वेळी खाजगी संस्थांकडून परवानगी मागण्यात येते त्यावेळी रोस्टर मंजूर करून देण्यात येते. दिनांक २ मे २०१२ नंतर शासनाने कोणत्याही संस्थेस पदे भरण्यासाठी परवानगी दिलेली नाही. ज्यावेळी नवीन शाळांना परवानगी शासनाकडून दिली जाते, त्यावेळी बिंदूनामावली तपासणीसाठी परवानगी देण्यात येते.

समितीने, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुलींना शासनातर्फे किती रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारींची चौकशी करण्यात येते काय, अशी विचारणा केली असता जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी खुलासा केला की, मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती देण्यात येत असून ती मागच्या वर्षीपासून ऑन लाईनच्या माध्यमातून इसीएसद्वारे वितरीत करण्यात येते. विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी प्रतीमहा ६० रुपये प्रमाणे १० महिन्यांसाठी एकूण ६०० रुपये व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये पूर्णवेळ शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी दरमहा १०० रुपये प्रमाणे १० महिन्यांसाठी एकूण १००० रुपये शिष्यवृत्ती वितरीत करण्यात येते. ऑन लाईन इसीएसद्वारे जिल्ह्यामधील ५ वी ते ७ वीच्या ७१६७ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते. त्याचप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती लागू आहे. ही गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रत्येक शाळेतील प्रत्येक वर्गातून प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या ५ वी ते ७ वी मधील विद्यार्थ्यांना २०० रुपये व ८ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी ४०० रुपये देण्यात येतात.

समितीने, विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी असलेल्या तांडा वस्ती योजनेंतर्गत गेल्या वर्षी जिल्ह्याला मिळालेला निधी व तांडा वस्तीसंदर्भात माहिती देण्यास सांगितले असता सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी विदित केले की, गेल्या वर्षी रुपये ५०,९९,३५९ इतका निधी मिळाला होता. ज्या तालुक्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते त्या अनुषंगाने बजेट मागितले होते. वंजारी धनगर समाज तांड्यावर राहतो. वाड्यापाड्यावर राहतात त्यांना समाविष्ट करू असे आम्ही सांगितले आहे. बृहत आराखडयानुसार तांड्यावरील लोकसंख्या ३,८५,३२७ इतकी आहे. प्रस्ताव पालकमंत्र्यांमार्फत शासनाला पाठविला आहे. त्या प्रस्तावाला अद्याप मान्यता मिळाली नाही.

समितीने, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेबाबत माहिती देण्यास सांगितले असता सहायक आयुक्तांनी समितीस विदित केले की, "यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना" ही समाजासाठी राबविली जाते. त्यामध्ये २० लाभार्थ्यांची एक वसाहत निर्माण केली जाते. प्रत्येक लाभार्थ्याला ५ गुंठे जमीन आणि घर तयार करून दिले जाते. त्या वसाहतीमध्ये समाज मंदिर, शाळेचा प्लॅन असतो. नाशिकमध्ये नांदगाव तालुक्यातील फुलेनगर येथे १ हेक्टर जागेवर उक्त योजना राबविली आहे. २० लाभार्थ्यांचा १ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. सन २०१२ मधील या योजनेसाठी एका वर्षात जागा निश्चित केली आहे. लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर प्रस्ताव शासनाला पाठविला जातो. याबाबत गटविकास अधिकाऱ्यांना वारंवार सूचना देऊन प्रस्ताव तयार करून घेतला आणि २० लोकांना चांगल्या दर्जाचा निवारा मिळाला.

समितीने, जिल्ह्यामध्ये मागासवर्गीयांसाठी स्वयंसेवी संस्थांकडून चालविली जाणारी वसतिगृहे किती आहेत, त्या वसतिगृहांमध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे तसेच ही वसतिगृहे कोणाच्या नियंत्रणाखाली आहेत, अशी विचारणा केली असता जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, नाशिक जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेमार्फत ९० वसतिगृहे मुलांची व ३५ वसतिगृहे मुलींची अशी



एकूण १२५ वसतिगृहे आहेत. या वसतिगृहात ४७३४ मुले व १६०८ मुली अशी एकूण ६३४२ संख्या आहे. १२५ वसतिगृहामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीची ४०० मुले व १०५ मुली असे एकूण ५०५ विद्यार्थी आहेत. या वसतिगृहांवर जिल्हा परिषदेचे नियंत्रण आहे. शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून निधीची तरतूद केली जाते. संबंधित जिल्हा परिषदेचे समाजकल्याण निरीक्षक व विस्तार अधिकारी यांच्यामार्फत वसतिगृहाची तपासणी केली जाते. मागील वर्षी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार गटविकास अधिकाऱ्यांमार्फत वसतिगृहांची तपासणी करण्यात आली. वसतिगृहातील सोयी सुविधांबाबत काही अनियमितता आढळून आली किंवा स्नानगृहात अस्वच्छता आढळली तर दंड केला जातो. त्याचप्रमाणे वसतिगृहाची मान्यता रद्द करण्याची तरतुदही आहे.

समितीने, यावर वसतिगृहांच्या तपासणीत सोयी सुविधांबाबत काही अनियमितता आढळून आल्यास केवळ दंड करून भागणार नाही, सदर वसतिगृहामध्ये सुधारणा होत नसल्यास त्यांनी शासनाची फसवणूक केल्याबद्दल कारवाई करण्याचा आग्रह धरला पाहिजे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी यामध्ये लक्ष घालून सुधारणा करणे आवश्यक आहे, अशी सूचना केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढे विदित केले की, माध्यमिक विद्यालयांबाबत आतापर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना संच मान्यता व बिंदू नामावलीबाबत कोणतेही अधिकार नव्हते. पण आता शिक्षण हक्क कायद्यामुळे अधिकार प्राप्त झाले असून आठवीपर्यंतच्या वर्गांना मंजुरी देताना शिक्षक व विद्यार्थ्यांची संख्या तपासूनच मंजुरी देण्यात येते.

रोस्टरची मागासवर्गीय कक्षाकडून तपासणी करून त्यानंतर पद भरती करण्यास मान्यता देण्यात येते. संस्थांच्या तपासणीच्या वेळी रोस्टर तपासणी करण्यात येते, या संस्थांना वर्षातून ३ वेळा भेटी देण्यात येतात. नाशिक जिल्ह्यामध्ये एकूण ६१५ अनुदानित शाळा असून त्यामधील ३३० संस्था आपल्या स्तरावर रोस्टर ठेवतात. शाळांमध्ये मागासवर्गीय उमेदवारांची पदे भरल्यानंतर त्यांच्या सेवा पुस्तकामध्ये जात पडताळणी संबंधीच्या नोंदी घेण्यात येतात. त्याची तपासणी करण्यात येत असते. चुकीच्या पध्दतीने पद भरती केली असेल तर त्या संस्थावर कारवाई केली जाते.

समितीने, मागासवर्गीयांचा अनुशेष न भरलेल्या कोणत्याही शाळेवर कारवाई केल्याचे प्रकरण उघडकीस आलेले नाही. मागासवर्गीयांची पदे भरली नसल्याने बेरोजगार उमेदवारांचे नुकसान होत आहे. जे संस्था चालक जाणीवपूर्वक पदे भरत नसतील किंवा चुकीच्या पध्दतीने भरती करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी अचानक शाळांची तपासणी करून बिंदूनामावली तपासली पाहिजे. ज्यावेळी पद भरती करावयाची असते त्यावेळी अनुदानित संस्थाचालक मान्यता घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे येतात. त्यावेळी शिक्षणाधिकारी संस्थेच्या रोस्टर बाबतची माहिती पाहतात. इतर वेळी या संस्थावर शिक्षण विभागाचे नियंत्रण नसते. नाशिक जिल्ह्यातील सर्व अनुदानित शाळांची तपासणी करून नियमानुसार बिंदुनामावली ठेवली आहे किंवा नाही, विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणारी फी योग्य आहे किंवा नाही, याबाबतची माहिती शिक्षण विभागातील संबंधितांकडून मागवून सर्व शाळांची तपासणी करण्यात यावी.

समितीने, विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात विभागीय पदोन्नती समितीची स्थापना तसेच या प्रवर्गासाठी विशेष मागासवर्ग कक्ष निर्माण करण्यात आला आहे काय, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, नाशिक जिल्हा परिषदेच्या वर्ग-क व वर्ग-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी "पदोन्नती समिती" कार्यान्वित असून सदर समितीचे प्रमुख जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कर्मचाऱ्यांना सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी जिल्हा परिषदेमध्ये "विशेष मागास वर्ग कक्ष" दिनांक १५ एप्रिल २००८ पासून गठीत करण्यात आला आहे. सदर कक्षामध्ये १ कक्ष प्रमुख, ३ सदस्य व १ सदस्य सचिव या प्रमाणे कक्ष कार्यान्वीत आहे.

समितीने, जिल्हा परिषदेसाठी सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४ ते मे २०१५ या आर्थिक वर्षात वर्षनिहाय मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी किती तरतूद करण्यात आली, त्यापैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी शासनाने किती रक्कमेची तरतूद केली होती, याबाबत विचारणा केली असता सन २०१२-१३ मध्ये शिक्षण फी, परीक्षा फी याकरिता ६३ लाख तरतूद होती. मुलींच्या उपस्थिती भत्त्यासाठी रुपये ८,८१,९३९ एवढी तरतूद होती. सन २०१३-१४ मध्ये रुपये ८,९५,७७० एवढी तरतूद होती. त्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला २०० आणि ४०० रुपये दिले जातात. या तरतुदींचा लाभ सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिला जातो. शिष्यवृत्तीची रक्कम देण्याकरिता बायोमेट्रिक पध्दतीचा अवलंब सुरू केला असून त्याप्रमाणे शिष्यवृत्ती वितरित करण्यात येते.

समितीने, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील ऊसतोड कामगार आणि शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, मुले शाळाबाह्य राहणार नाहीत याकरिता शाळा सुरू होण्यापूर्वी शिक्षकांना गावामध्ये फेरी मारण्यास सांगितले जाते. मागील वर्षी जी मुले शाळाबाह्य आढळून आली होती, त्यापैकी ९७ टक्के मुले यावर्षी शाळेत दाखल करण्याचा प्रयत्न केला असून ३ टक्के मुले शाळाबाह्य राहिली आहेत. जी ३ टक्के शाळाबाह्य मुले आहेत, ती मुले स्थलांतरित झाली असण्याची शक्यता आहे. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी ३-४ महिन्यांच्या कालावधीकरीता वस्ती शाळा योजना आहे. सदर ऊस तोडीचा कालावधी संपल्यानंतर पुन्हा त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गावामधील शाळेमध्ये समाविष्ट करण्यात येते. सर्व शाळाबाह्य मुले शाळेत आली पाहिजेत यादृष्टीने यावर्षी कार्यवाही करण्यात येत आहे.

समितीने, धनगर समाजाचे काही लोक या भागात राहतात त्यांची मुले मेंढ्यांच्या कळपाबरोबर फिरत असतात, त्यांचा शोध घेण्यासाठी काय प्रयत्न करणार आहात, याबाबत विचारणा केली असता शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी विदित केले की, संपूर्ण राज्यामध्ये सार्वत्रिक स्वरूपाच्या शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण होणार आहे. जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर, ग्राम पंचायत स्तरावर सर्वेक्षणासाठी समिती गठीत करण्यात येणार आहे. त्यानुसार राज्यभरातील शाळाबाह्य मुलांचे एकाच दिवशी सर्वेक्षण करण्याचे योजले आहे. ज्या लोकांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर होत असते त्या मुलांना जवळच्या शाळेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे तसेच त्या मुलांसाठी मोबाईल स्कूलची योजना देखील विचाराधीन आहे.



समितीने यावर, शासन अनेक योजना राबविते परंतु त्याचा प्रचार व प्रसिध्दी केली जात नसल्यामुळे त्या लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मोहिमेद्वारे जिल्ह्यातील वृत्तपत्रे, दूरदर्शन व इतर माध्यमातून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसिध्दी करावी, ज्यामुळे ही योजना लोकांना माहिती होईल व तिचा उद्देश पूर्ण होऊ शकेल, असे मत व्यक्त करून जिल्हा परिषदेतर्फे करण्यात येणाऱ्या प्रयत्नांसंदर्भात समाधान व्यक्त केले.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने जिल्हा परिषद, नाशिक येथे दिनांक २४ जून, २०१५ रोजी घेतलेल्या बैठकीच्या वेळी समितीला आश्वासित केलेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ९ फेब्रुवारी ,२०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने नाशिक जिल्हा परिषदेत खाजगी अनुदानित शाळांवर जिल्हा परिषदेचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे तसेच नाशिक जिल्ह्यातील खाजगी शाळांची बिंदू नामावलीची तपासणी केली जात नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे, याबाबत विचारणा केली असता प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खाजगी शाळांकडून बिंदू नामावली राखली जाते की नाही याबाबत तपासणी करण्याची जबाबदारी विभागीय कार्यालय (मागासवर्ग कक्ष) यांचेवर असते. कोणत्याही पदांना मंजुरी देताना शिक्षणाधिकारी मागासवर्गीय कक्षाकडून बिंदू नामावलीची तपासणी करून घेतल्यानंतरच पद भरण्याची मंजुरी देतात. तात्पुरती पदे भरावयाची असली तरी शिक्षणाधिकाऱ्यांच्या मंजूरीशिवाय भरती करता येत नाही. ज्या माध्यमिक खाजगी शाळा आहेत त्यांची बिंदू नामावली मागासवर्ग कक्षाकडून अंतिम करण्यात येते, पदे भरण्यापूर्वी मागासवर्ग कक्षाकडून बिंदू नामावलीच्या तपासणीशिवाय त्या पदांना मंजुरी दिली जात नाही. यासंदर्भात शिक्षण विभागाचा दिनांक २० मार्च, २०१४ रोजीचा शासन निर्णय आहे असे समितीस सांगितले.

समितीने, खाजगी अनुदानित ६१५ माध्यमिक आश्रमशाळा आहेत. त्यांची पाहणी करण्याचे निकष काय आहेत, आश्रमशाळांना अचानक भेटी दिल्या जातात काय, याबाबत माहिती देण्यास सांगितले असता शिक्षणाधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, प्रत्येक गट शिक्षणाधिकाऱ्याकडे तालुक्यातील ४० शाळांची यादी दिली जाते. वर्षाअखेर ते तपासणी करून घेतात. १५ गट शिक्षणाधिकारी या आश्रमशाळांची तपासणी करतात. त्याप्रमाणे वर्षभरात हे शिक्षणाधिकारी शाळांची तपासणी करीत असतात. अचानक शाळांना भेटी दिल्या जातात. सन २०१० पासून आरटीई कायदा लागू केलेला आहे. गुणवत्ता यादीचा तक्ता माननीय सचिव व अधिकारी यांच्यामार्फत इयत्ता २ ते ८ वी पर्यंत सुरु केलेला आहे. त्यामध्ये मागील वर्षाच्या भाषा व गणिताच्या चाचण्या घेऊन तपासण्या केल्या जातात आणि त्यातून गुणवत्तेची पाहणी केली जाते. खाजगी अनुदानित शाळांचा आढावा बैठक घेण्यात येते. माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांची बैठक दर महिन्याला घेण्यात येते आणि संस्था चालकांच्या वर्षातून दोन बैठका घेतल्या जातात शाळांना ज्या भौतिक सुविधा देणे आवश्यक आहे त्याबाबत संस्था चालकांना कळविण्यात येते.

समितीने यावर नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस व्यवस्थित उत्तरे दिली नव्हती. राज्यामधील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांचा समाजकल्याण विभागाशी समन्वय असला पाहिजे. दोन्ही विभागांनी मिळून रोस्टरची तपासणी केली पाहिजे. बिंदू नामावली ही कायदेशीर बाब असून सामान्य प्रशासन विभाग बिंदू नामावलीची बाब बघते. कायद्याप्रमाणे बिंदू नामावलीची तपासणी करावीच लागणार आहे. बिंदू नामावलीच्या तपासणीशिवाय कोणतीही भरती केली जात नाही.

समितीने, नाशिक भेटीच्या वेळी प्रयोग शाळा तंत्रज्ञ, कनिष्ठ लिपिक आणि परिचर यांची रिक्त असलेली पदे माहे नोव्हेंबर मध्ये भरण्यात आली आहेत काय, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, वरिष्ठ लिपिक, आरोग्य परिक्षक, स्थापत्य अभियंता, कनिष्ठ अभियंता, परिचर, ग्रामसेवक, पर्यवेक्षक आणि आरोग्य सेवक या पदांना शासनाने मान्यता दिल्यानंतर जाहिरात दिली होती. त्यामध्ये परिचारकांची १९ पदे होती. यापैकी ९ पदे विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील होती. या पदांची परीक्षा झालेली असून लवकरच निकाल जाहीर करण्यात येईल.

समितीने, प्राथमिक शिक्षकांची किती पदे रिक्त आहेत, पेसा ॲक्ट अंतर्गत काही तालुके आदिवासी जाहीर केलेले असल्याने काही शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहेत, त्यांचे समायोजन कशा प्रकारे करण्यात येणार आहे, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आयुक्त, महाराष्ट्र शिक्षण परिषद, पुणे यांनी ३१९ उमेदवार उपलब्ध करून दिले, त्यापैकी ५१ पदे विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गाची होती. यापुर्वी बिंदू नामावली सन २०११ साली तपासली होती, त्यामुळे आता बिंदू नामावली तपासणी झाल्यावरच पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे विदित केले.

समितीने, नाशिक जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील शाळाबाह्य मुलांबाबत माहिती देण्यास सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ४ जुलै २०१५, दिनांक १५ जानेवारी आणि ३१ जानेवारी २०१६ या तीन दिवशी शाळाबाह्य मुलांबाबत मोहिम राबविली होती. त्यामध्ये ८६८ शाळाबाह्य मुले होती त्यापैकी ५० टक्के विद्यार्थ्यांना शाळेत पाठविले आहे.

समितीने, अनुकंपा तत्त्वावर किती प्रतिक्षा यादी आहे तसेच अनुकंपा तत्त्वावर ज्या उमेदवारांचे वय वाढत जाते, अशा उमेदवारांसाठी कोणता निर्णय घेण्यात येतो, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, दिनांक १ जानेवारी २०१५ अखेर अनुकंपा तत्त्वाच्या प्रतिक्षा यादीवर १२२ उमेदवार होते. शासनाच्या नियमाप्रमाणे जेव्हा जाहिरात दिली जाते तेव्हा एकूण कर्मचाऱ्यांच्या दहा टक्के कर्मचाऱ्यांना नियुक्ती देता येते. ५ उमेदवारांच्या संदर्भातील कार्यवाही पुढील दोन महिन्यांत पूर्ण करण्यात येईल, जिल्हा स्तरावर लवकरात लवकर अनुकंपा तत्त्वावरील पदे विहित वयोमर्यादेत भरण्यात येतील.

समितीने, जिल्ह्यात वसतिगृहांमध्ये अनियमितता आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निदेश दिले होते, त्याबाबत कोणती कारवाई केली आहे अशी विचारणा केली असता



सहाय्यक आयुक्तांनी विदित केले की, या वसतिगृहांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित भेटी दिल्या जातात. संबंधितांना दंड लावण्यात येतो व गंभीर स्वरूपाचे गुन्हे असतील तर त्या वसतिगृहाची मान्यता रद्द केली जाते.

समितीने, यशवंतराव चव्हाण वसाहत योजनेची कशाप्रकारे अंमलबजावणी केली जाते, अशी विचारणा केली असता सहाय्यक आयुक्तांनी माहिती दिली की, या योजनेत २० लाभार्थ्यांना २६९ चौ. फुटांचे घर दिले जाते. नांदगाव, फुले नगर येथील एक हेक्टर जागेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे यापुर्वीच पाठविलेला आहे तसेच दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी आयुक्तांमार्फत मंत्रालयीन स्तरावर प्रस्ताव पाठविलेला आहे.

समितीने, जिल्हा परिषदेत वर्ग-१ ते वर्ग-४ मधील अधिकारी/ कर्मचारी यांची एकूण मंजूर पदे किती आहेत, त्यापैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीची किती पदे आरक्षित आहेत व किती पदे रिक्त आहेत याची माहिती समितीला देण्याबाबत सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सरळसेवेने भरावयाची गट-क मध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची १६५७ पदे असून त्यापैकी १६२५ पदे भरलेली आहेत व ३२ पदांचा अनुशेष आहे. गट-ड मध्ये एकूण १२२ पदे असून त्यापैकी ११४ पदे भरलेली आहेत व ८ पदे रिक्त आहेत. तसेच पदोन्नतीने भरावयाची गट-क ची २२१ पदांपैकी २०६ पदे भरली असून १५ पदांचा अनुशेष आहे. गट-ड मध्ये ११ पदे असून ७ पदे भरली आहेत व ४ पदे रिक्त आहेत असे समितीस विदित केले.

समितीने, खाजगी शाळांमधील आरक्षणाबाबतीत व जिल्हा परिषदांवर आपला अंकुश आहे काय, याबाबत विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खाजगी प्राथमिक शाळांवर लक्ष देण्यासाठी मुख्याध्यापक नेहमीच सजग असतात. त्याचप्रमाणे माननीय उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनानुसार रितसर प्रवेश दिला आहे की नाही हे सुद्धा बघितले जाते. पहिल्या वर्गासाठी प्रवेश द्यायचा असेल आणि अर्ज जास्त आले असतील तर लकी ड्रॉ पद्धतीने प्रवेश दिला जातो. ज्यावेळेस प्रवेशाची तारीख दिलेली असते किंवा लकी ड्रॉ काढायचा असेल त्यावेळेस शिक्षणाधिकारी उपस्थित असतात. काही शाळांमध्ये कमी विद्यार्थी असतील तर प्रवेश देतो. काही नागरिकांच्या किंवा पालकांच्या तक्रारी असतील तर चौकशी करण्यात येते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असेही विदित केले की, माध्यमिक शाळांच्या बाबतीत काही अडचण नाही. उच्च माध्यमिक प्रवेशासाठी जिल्ह्याची विद्यार्थी प्रवेशाची क्षमता आणि प्राप्त होणारे अर्ज यातून शासनाच्या आरक्षित जागेनुसार प्रवेश निश्चित करण्यात येतात. यासाठी त्या-त्या विभागाचे चौकशी अधिकारी नेमून तपासणी केली जाते.

समितीने, राज्यातील ज्या खाजगी शाळा आहेत त्या शासनाकडून अनुदान घेत नाहीत, अशा शाळा मोठ्या प्रमाणावर देणगीच्या रुपात पैसे घेतात यावर शासनाचे काही बंधन नाही काय, या खाजगी शाळा मुलांच्या पालकांकडून दोन ते अडीच लाख रुपये फी घेतात. काही मुलांच्या पालकांची फी भरण्याची क्षमता नसते. काही वेळेस ५० विद्यार्थी वेटिंगमध्ये ठेवतात. त्यांना फी भरल्याशिवाय त्यांना घेतले जात नाही. असे मत व्यक्त केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ज्या खाजगी कायम विनाअनुदानित शाळा असतात, अशा शाळांना शासन मान्यता देते. त्यांना जी फी मिळते त्यातून त्यांना सर्व खर्च करायचा असतो. दुर्बल आणि वंचित घटकातील मुलांसाठी २५ टक्के आरक्षण देण्यात येते.

समितीने यावर, नाशिक शहरातील जेवढ्या शाळा आहेत त्या सर्वांची माहिती समितीला एक महिन्याच्या आत कळविण्यात यावी असे विदित केले असता एक महिन्याच्या आत समितीला माहिती कळविण्यात येईल, असे समितीस विदित केले.

समितीने, समाजकल्याण विभागांतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये १.५६ कोटी मिळालेले होते. त्यातील १ कोटी ५० लाख रुपये खर्च झालेला आहे. सन २०१३-२०१४ मध्ये १ कोटी ७० लाख रुपये प्राप्त झालेले होते. त्यापैकी १ कोटी ६२ लाख रुपये खर्च झालेला आहे आणि सन २०१४-२०१५ मध्ये १ कोटी ४५ लाख रुपये तरतूद होती त्यातून १ कोटी ३४ लाख रुपये खर्च झालेले आहेत. खर्चाची एकूण टक्केवारी जवळपास ७५ टक्के आहे. ज्यावेळेस आमदार आणि खासदार यांचा निधी शिक्षण खात्यासाठी वर्ग होऊन १० महिने झालेले असतानासुध्दा आपल्या विभागाकडून टेंडर काढण्यात येत नाही. यामुळे विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाते. प्राथमिक शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात डोनेशन घेतले जाते. आपल्याला २५ टक्के अनुदान मिळते आणि २५ टक्के आरक्षण असते. याबाबतची माहिती घेऊन समितीला २० दिवसांच्या आत अहवाल सादर करण्यात यावा, तसेच आपल्याकडे ज्या जाहिराती काढल्या आहेत, त्याबाबत विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांवर अन्याय होणार नाही यादृष्टीने लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी, असे निदेश दिले.

समितीने, शालेय विद्यार्थ्यांना दोन गणवेश खरेदी करण्यासाठी फक्त ४०० रूपये देण्यात येतात. ४०० रुपयांमध्ये दोन गणवेश मिळत नाहीत. त्यामुळे या रकमेत वाढ करावी, अशी सूचना केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व शिक्षा अभियानातून गणवेश खरेदीसाठी निधी दिला जातो. गणवेश खरेदी करण्यासाठी ४०० रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे विषयशिक्षण विभागाच्या सचिवांशी चर्चा करून रक्कम वाढविण्याबाबत विचार करण्यात येईल, असे प्रधान सचिवांनी नमूद केले. यावर ही रक्कम वाढवून मिळावी असा प्रस्ताव शासनाला सादर करावा. त्या प्रस्तावाचा पाठपुरावा समितीमार्फत करण्यात येईल, असे समितीने आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

मागासवर्गीयांचा अनुशेष न भरलेल्या कोणत्याही शाळेवर कारवाई केल्याचे प्रकरण उघडकीस आलेले नाही. मागासवर्गीयांची पदे भरली नसल्याने बेरोजगार उमेदवारांचे नुकसान होत आहे. जे संस्था चालक जाणीवपूर्वक पदे भरत नसतील किंवा चुकीच्या पद्धतीने भरती करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी अचानक शाळांची तपासणी करून बिंदू नामावली तपासली पाहिजे. ज्यावेळी पद भरती करावयाची असते त्यावेळी अनुदानित संस्थाचालक मान्यता घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे येतात.त्यावेळी शिक्षणाधिकारी संस्थेच्या रोस्टर बाबतची माहिती पाहतात. इतर वेळी या संस्थांवर शिक्षण विभागाचे नियंत्रण नसते.नाशिक जिल्ह्यातील सर्व अनुदानित शाळांची तपासणी करून नियमानुसार बिंदूनामावली ठेवली आहे किंवा नाही, विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणारी फी योग्य आहे किंवा नाही, याबाबतची माहिती शिक्षण विभागातील संबंधितांकडून मागवून सर्व शाळांची तपासणी करण्यात यावी, असे अभिप्राय समितीने व्यक्त केले.



(१) काही शिक्षण संस्था मनमानी पद्धतीने विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्यावेळी देणगी स्वरुपात पैसे घेऊन पालकांची पिळवणूक करीत असतात. सदर संस्थांची बिंदू नामावली तपासली जात नाही. फक्त पदे भरण्याच्या वेळी खाजगी संस्थांकडून परवानगी मागण्यात येते त्यावेळी शासनाकडून नवीन शाळांना परवानगी दिली जाते असे समितीच्या निदर्शनास आले. **सबब, मनमानी पद्धतीने पालकांची फसवणूक करणे, बिंदू नामावली अद्ययावत करून न घेणे याबाबींवर शासनाने योग्य ती कार्यवाही करून त्याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) शिक्षणापासून वंचित असलेल्या शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी संपूर्ण राज्यामध्ये सार्वत्रिक स्वरूपाच्या शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण होणार आहे. जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर, ग्राम पंचायत स्तरावर सर्वेक्षणासाठी समिती गठित करण्यात येणार आहे. त्यानुसार राज्यभरातील शाळाबाह्य मुलांचे एकाच दिवशी सर्वेक्षण करण्याचे योजले आहे. ज्या लोकांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर होत असते त्या मुलांना जवळच्या शाळेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे तसेच त्या मुलांसाठी मोबाईल स्कूलची योजना देखील विचाराधीन आहे. असे समितीच्या निदर्शनास आणून दिले. **याबाबत समितीची अशी शिफारस आहे की, राज्यभरातील शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्यासाठी जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर व ग्रामपंचायत स्तरावर शक्य तेवढ्या लवकर समित्या गठित करून मोबाईल स्कुलची योजना अंमलात आणावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी.**

(३) समितीने, नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली असता सरळसेवेने भरावयाच्या विस्तार अधिकारी पदांमध्ये एका पदाचा अनुषेश असल्याचे आढळून आले. सदर पद हे वरिष्ठ सहाय्यक पद अस्तित्वात न राहिल्याने पदोन्नतीने भरता येत नाही. सदर पद सरळसेवेने भरण्याची परवानगी मिळण्याबाबत शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. **अतः नाशिक जिल्हा परिषदेने सादर केलेल्या प्रस्तावावर शासनाने लवकरात लवकर निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी.**

(४) नाशिक जिल्ह्यात खाजगी स्वंयसेवी संस्थांच्या वसतिगृहांमध्ये अनियमितता आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात येते याबाबत विचारणा केली असता संबंधितांना दंड लावण्यात येतो तसेच गंभीर स्वरुपाची गुन्हे असतील तर त्या वसतिगृहाची मान्यता रद्द केली जाते असे समितीस विदित केले. **सबब, अनियमितता आढळून आल्यास संस्था चालकांविरुद्ध केवळ दंड न आकारता फौजदारी गुन्हा दाखल करावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(५) समितीने, नाशिक जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सरळसेवेने भरावयाच्या गट-क व गट-ड मध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाचा ४३ पदांचा अनुशेष तसेच पदोन्नतीचा गट-क व गट-ड मध्ये एकूण १९ पदांचा अनुशेष असल्याचे समितीस आढळून आले. सबब, **उक्त पदांचा अनुशेष लवकरात लवकर भरून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**





परिशिष्ट- एक

**जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून भेटीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती**

## विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती

जिल्हा परिषदेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांच्या कल्याणासाठी जिल्हा परिषदेने घेतलेल्या विविध योजना व आर्थिक उन्नतीच्या योजना बाबतची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १६ | जिल्हा परिषदेसाठी सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४ ते मे २०१५ या आर्थिक वर्षात वर्षनिहाय मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी किती तरतुद करण्यात आली ? त्यापैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी शासनाने किती रकमेची तरतुद केली होती ? | जिल्हा परिषदेसाठी सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ या आर्थिक वर्षात वर्षनिहाय विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी शासनाने केलेल्या रकमेची तरतुद खालील प्रमाणे. |

शिक्षण फी, परिक्षा फी (मॅट्रीक) समाजकल्याण विभाग

| अ.क्र. | वर्ष | प्राप्त तरतुद |
|---|---|---|
| १ | सन २०१२-१३ | ४०१४००० |
| २ | सन २०१३-१४ | ३२८३००० |
| ३ | सन २०१४-१५ | ३२३६००० |

शिक्षण प्राथमिक विभाग

| सन | समाजातील दुर्बल घटकांतील मुलींना उपस्थिती भत्ता उपलब्ध रक्कम | त्यापैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुलींना उपस्थिती भत्ता खर्च रक्कम | समाजातील दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य उपलब्ध रक्कम | त्यापैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्य खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|
| सन २०१२-१३ | ६३१६२०६ | ८८१९३९ | १२४६८३८७ | ९७२५६१ |
| सन २०१३-१४ | ५५३४६३६ | ८९५७७० | १०९११६३१ | ३७१४४७ |
| सन २०१४-१५ | ६५५४६७५ | १०५६४४० | ४७६३१४० | ० |
| एकुण | १८४०५५१७ | २८३४१४९ | २८१४३१५८ | १३४४००८ |



## विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती

जिल्हा परिषदेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांच्या कल्याणासाठी जिल्हा परिषदेने घेतलेल्या विविध योजना व आर्थिक उन्नतीच्या योजना बाबतची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १७ | विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४ ते मे २०१५ या आर्थिक वर्षात शासनामार्फत कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या आहेत, सदर योजनांवर वर्षनिहाय किती रक्कम खर्च करण्यात आली ? | सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ या कालावधीत शासन मार्फत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी खालील योजना राबविणेत आलेल्या आहे. सदर योजनांवरील वर्षनिहाय खर्च खालीलप्रमाणे. |

| अ. क्र. | योजनेचे नांव | सन २०१२-१३ | | सन २०१३-१४ | | सन २०१४-१५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त तरतुद (रु.लाखात) | खर्च | प्राप्त तरतुद (रु.लाखात) | खर्च | प्राप्त तरतुद (रु.लाखात) | खर्च |
| १ | माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी / परिक्षा फी | ४०.१४ | ३६.४९ | ३२.८३ | ३१.०२ | ३२.३६ | ३१.५८ |
| २ | गुणवत्ता शिष्यवृत्ती | ११.२७ | ९.६५ | १५.२५ | ९.०१ | ११.६० | ८.८९ |
| ३ | इ.५ वी ते ७ वी मधील वि.जा.भ.ज. मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यावृत्ती | ८४.७८ | ८४.७८ | ७७.२४ | ७७.२४ | ७६.३० | ७३.४२ |
| ४ | मागासवर्गीय वसतीगृहांना सहाय्यक अनुदान | १९.९९ | १९.९८ | ४५.०२ | ४५.०१ | २५.२७ | २५.२७ |
| ५ | मागासवर्गीय बालवाड्यांना सहाय्यक अनुदान | - | - | - | - | - | - |

## विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती

जिल्हा परिषदेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांच्या कल्याणासाठी जिल्हा परिषदेने घेतलेल्या विविध योजना व आर्थिक उन्नतीच्या योजना बाबतची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्ष | विमुक्त जाती | | | भटक्या जमाती | | |
| | | | मुले | मुली | एकुण | मुले | मुली | एकुण |
| १८ | सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४ ते मे २०१५ या गेल्या तीन वर्षात जिल्ह्यातील माध्यमिक शाळेत विमुक्त जाती व भटक्या जमातीचे एकुण किती विद्यार्थी शिक्षण घेत होते ? व त्या पैकी मुलांची व मुलींची संख्या किती होती ? | २०१२-१३ | ३०३५ | २३४४ | ५३७९ | १३२६६ | १०६७५ | २३९४१ |
| | | २०१३-१४ | २८७६ | २२४७ | ५१२३ | १२९८० | १०७९१ | २३७७१ |
| | | २०१४-१५ | ३१९५ | २४४२ | ५६३७ | १४२६४ | ११६०३ | २५८६७ |
| | | एकुण | ९१०६ | ७०३३ | १६१३९ | ४०५१० | ३३०६९ | ७३५७९ |



## विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती

जिल्हा परिषदेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांच्या कल्याणासाठी जिल्हा परिषदेने घेतलेल्या विविध योजना व आर्थिक उन्नतीच्या योजना बाबतची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १९ | सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४ ते मे २०१५ या आर्थिक वर्षात विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यावर तालुकानिहाय शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क यावर किती रक्कम खर्च करण्यात आली ? तसेच, जिल्ह्यातील किती व कोणत्या शाळांमध्ये प्रवेश सत्र वाचनालय, प्रयोगशाळा व क्रिडा शुल्क शासनामार्फत परस्पर अदा करण्यात आली आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? | तालुकानिहाय शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क यावरील तालुकानिहाय खर्च खालीलप्रमाणे असुन, जिल्हयातील शाळांमध्ये प्रवश सत्र वाचनालय, प्रयोगशाळा व क्रिडा शुल्क या कार्यालयामार्फत अदा केले जात नाही. |

| अ. क्र. | तालुका | सन २०१२-२०१३ | | | सन २०१३-२०१४ | | | सन २०१४-२०१५ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शाळांची संख्या | लाभार्थी संख्या | एकुण रक्कम | शाळांची संख्या | लाभार्थी संख्या | एकुण रक्कम | शाळांची संख्या | लाभार्थी संख्या | एकुण रक्कम |
| १) | इगतपुरी | ४४ | ५८८ | ४७३०२० | ३० | ३९४ | १३०१२० | ४३ | ५३४ | २९८५७० |
| २) | देवळा | २७ | २१२ | ६९९६० | २६ | २०५ | ६७६५० | २८ | १७३ | ५७०९० |
| ३) | कळवण | १२ | ८० | २६४०० | १२ | ७४ | २४४२० | १२ | ७४ | २४४२० |
| ४) | पेठ | १ | १० | ३३०० | १ | ६ | १९८० | ३ | ४ | १३२० |
| ५) | सुरगाणा | २ | ८ | २९७० | २ | १४ | ४६२० | ६ | ५ | ४९५० |
| ६) | नांदगांव | ५० | १०८२ | ४३३०२० | ४९ | १०१४ | ४१७३८० | ४६ | ११४१ | ३९१०४० |
| ७) | दिंडोरी | ३५ | २२२ | ८४६२० | २९ | २०३ | ८०५२० | २७ | २०२ | ६६६६० |
| ८) | सटाणा | ४५ | ४३१ | १४२३७० | ४२ | ३९५ | १३०३७० | ५१ | ४७० | १५५८८० |
| ९) | येवला | ४४ | ६१६ | २५३५३० | ४३ | ६०० | २२५१९० | ३१ | ४९० | १६२१८० |
| १०) | चांदवड | ४५ | ३२८ | ११०१३० | ४१ | ३३४ | ११०३२० | ३८ | ३५० | ११५६४० |
| ११) | मालेगांव | ७४ | ८५१ | ३१९५९० | ७४ | ८५० | ३१९८१० | ५४ | ६९१ | २२८२९० |
| १२) | निफाड | ६२ | ९६७ | ३४६४६० | ६२ | ९११ | ३१६०२० | ६० | ९९३ | ३२७९५० |
| १३) | त्र्यंबकेश्वर | ९ | ७१ | ३८४६० | १० | ७९ | ४९४५० | १२ | ६२ | २०४६० |
| १४) | सिन्नर | ६१ | १४८५ | ५२२०४० | ५८ | १३८० | ४८५७०० | ६२ | १४०२ | ४६३००० |
| १५) | नाशिक | १३७ | २३२१ | ८२३०९० | १२२ | २२३३ | ७३८६४० | १३३ | २३९९ | ८३९८०० |
| | एकुण | ६४८ | ९२७२ | ३६४८९६० | ६०१ | ८६९२ | ३१०२१९० | ६०६ | ८९९० | ३१५७२५० |

भटक्या जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

जिल्हा परिषद नाशिक प्रश्नावली

| अ.क्रं. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १९ | सन २०१२-१३,२०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षात विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांवर तालूकानिहाय शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क बाबत किती रक्कत खर्च करणेत आली तसेच जिल्ह्यातील किती व कोणत्या शाळांमध्ये सत्र वाचनालय व प्रयोगशाळा व क्रिडा शुल्क शासनामार्फत परस्पर अदा करण्यात आली आहेत? नसल्यास त्याची कारणे काय आहेत? | (खालीलप्रमाणे) |

| वर्ष | विद्यार्थी संख्या | | एकुण खर्च |
|---|---|---|---|
| | मुले | मुली | |
| २०१२-१३ | १२८८९६ | | १८९८००० |
| २०१३-१४ | २२४७४८ | | १८७४००० |
| २०१४-१५ | २२९९७५ | | १९८४००० |

उपरोक्त सादर केलेली माहिती ही फक्त इ.१० वी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण सवलत दिलेल्या एकुण विदयार्थ्याची आहे. सदर शिष्यवृत्ती जात प्रर्वगाचा आधारे दिली जात नाही. किंवा कोणत्याही विशेष जात प्रवर्गासाठी लागु नाही.

| वर्ष | वेतनेतर अनुदान पात्र लाभार्थी शाळा संख्या | लाभार्थी शाळांच्या अध्यक्ष / मुख्याध्यापकांच्या संयुक्त खाती जमा करणेत आलेले अनुदान रक्कम |
|---|---|---|
| २०१२-१३ | ---------- | ---------- |
| २०१३-१४ | ३५९ | ५७८८७१५६ |
| २०१४-१५ | ५४८ | ७११८४४६२ |

सन २०१३ पावेतो कोणतेही वेतनेतर अनुदान शासनाने खासगी अनुदानित माध्यमिक शाळांना दिलेले नाही. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ च्या लाभार्थी शाळांच्या अध्यक्ष / मुख्याध्यापकांच्या संयुक्त खाती जमा करणेत आलेले आहेत. दिनांक २९ जानेवारी, २०१४ च्या शासनादेशानुसार १०० टक्के योजनेतर मध्ये वेतन घेणा-या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनानुसार दिनांक १ एप्रिल २००८ रोजी देय असलेल्या ५ व्या वेतनआयोगानुसार अनुदान गोठवून त्यानुसार ५ टक्के वेतनेतर अनुदान देय होते. मात्र यासाठी शाळांनी दिनांक ३१ मार्च २०१३ रोजी भौतिक सुविधा व इतर बाबींची पुर्तता करून RTE २००९ च्या नियम ११ पोटनियम ४ अन्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे कडून शाळेचे दोन वर्षासाठीचे मान्यता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशा पात्र शाळा संख्या व दिलेले वेतनेतर अनुदान सोबत प्रमाणे आहे. ज्यातील ४ टक्के वेतनेतर अनुदान व १ टक्का ईमारत भाडे व देखभाल यासाठी खर्च करावयाचे असते यातुन शाळा प्रयोगशाळा साहीत्य व क्रिडा व वाचनालयातील खर्च करीत असतात. याकारणासाठी वि.जा. व भ.ज. या प्रवर्गासाठी स्वतंत्र खर्च नाही वा शासनाची इतर योजना नाही.



## विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती

जिल्हा परिषदेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांच्या कल्याणासाठी जिल्हा परिषदेने घेतलेल्या विविध योजना व आर्थिक उन्नतीच्या योजना बाबतची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| २० | सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात जिल्हयातील कोणकोणत्या शाळांमधील किती मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे, त्यापैकी ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी मध्ये किती विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागू केली आहे ? | सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात जिल्हयातील इयत्ता ५ वी ते १० वी तील विजाभज/विमाप्र. चे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी मध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणेत आलेली आहे. |

| अ.क्र | वर्ग | सन २०१२-१३ | सन २०१३-१४ | सन २०१४-१५ |
|---|---|---|---|---|
| | | गुणवत्ता शिष्यवृत्ती मंजूर केलेल्या एकूण विजाभज/ विमाप्र विद्यार्थ्यांची संख्या | गुणवत्ता शिष्यवृत्ती मंजूर केलेल्या एकूण विजाभज/ विमाप्र विद्यार्थ्यांची संख्या | गुणवत्ता शिष्यवृत्ती मंजूर केलेल्या एकूण विजाभज/ विमाप्र विद्यार्थ्यांची संख्या |
| १ | इ.५ वी ते ७ वी | १८०३ | १६५७ | १५२८ |
| २ | इ. ८ वी ते १०वी | १५२३ | १४२४ | १४६१ |
| | एकूण | ३३२६ | ३०८१ | २९८९ |

शाळांमधील सदर शैक्षणिक वर्षात नाशिक जिल्हयातील **सर्व** शाळांमध्ये मागासवर्गीय विदयार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती वर्गात १ व २ नंबर आलेल्या विदयार्थ्यांना लागू करण्यात आलेली आहे.

इयत्ता. ५ वी ते ७ वी तील प्रत्येक शाळेतील प्रत्येक वर्गातून विजाभज प्रवर्गाची १ व २ नंबर आलेल्या विदयार्थ्यांस रुपये २००/- आणि इयत्ता ८ वी ते १० वी तील प्रत्येक शाळेतील प्रत्येक वर्गातून विजाभज प्रवर्गाची १ व २ नंबर आलेल्या विदयार्थ्यांस रुपये ४००/- गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्यात येते.

## विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती

**जिल्हा परिषदेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांच्या कल्याणासाठी जिल्हा परिषदेने घेतलेल्या विविध योजना व आर्थिक उन्नतीच्या योजना बाबतची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली**

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| २१ | जिल्हा परिषद अंतर्गत माध्यमिक शाळेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनेमध्ये मागिल तीन वर्षात गैरव्यवहाराची / भ्रष्टाचाराची किती प्रकरणे आढळुन आली आहेत ? असल्यास, त्यामध्ये किती अधिकारी/कर्मचारी दोषी आढळुन आले आहेत ? त्यानुसार त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे ? | जिल्हा परिषद अंतर्गत माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राबविण्यांत येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनेमध्ये मागील तीन वर्षात गैरव्यहाराची / भ्रष्टाचाराची एकही प्रकरण आढळुन आलेली नसल्याने, सदरची माहिती निरंक आहे. |



विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती

**जिल्हा परिषदेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांच्या कल्याणासाठी जिल्हा परिषदेने घेतलेल्या विविध योजना व आर्थिक उन्नतीच्या योजना बाबतची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली**

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| २२ | १) अनुदानीत वसतीगृह चालवणाऱ्या स्वंयसेवी संस्थांना अनुदान प्रदान करावयाच्या अटी व शर्ती काय आहेत ? | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करता यावा, ग्रामीण भागामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधील शाळा गळतीचे प्रमाण कमी व्हावे, आर्थिक दुरावस्थेमुळे मागासवर्गीय पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणात अडचणी येवू नयेत आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा या उद्देशाने ही योजना सन १९५०-५१ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.<br>सदरची योजनाही शासन निर्णय क्र. बीसीएच-१०९७/प्र.क्र.१०७/मावक-४ दिनांक १६ मार्च १९९८ च्या शासन निर्णयानुसार कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदर योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.<br>१) वसतिगृह एक वर्ष अगोदर चालू केलेले असले पाहीजे.<br>२) संस्था नोंदणीकृत असावी.<br>३) वसतिगृहात इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, आर्थिकदृष्टया मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाने ठरवून दिलेल्या विहित प्रवेशित टक्केवारीनुसार प्रवेश देण्यात यावा.<br>४) विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाकरीता पुरेशा प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध असाव्यात.<br>५) विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २४०००/- पेक्षा जास्त नसावे. परंतु शैक्षणिक प्रयोजनासाठी शासन वेळोवेळी विहित करेल अशा उत्पन्नाच्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल अशा मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देता येईल.<br>६) जे विद्यार्थी एकाच इयत्तेत दोनदा नापास झाले असतील त्यांना कोणत्याही प्रकारचे अनुदान देय असणार नाही.<br>७) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त इतर राज्यातील असतील त्याना कोणत्याही प्रकारचे अनुदान देय असणार नाही.<br>८) प्रति विद्यार्थी प्रतिमाह रुपये ९००/- प्रमाणे १० महिन्यांकरीता शासनाकडून निवासी विद्यार्थ्यांसाठी परिपोषण अनुदान देण्यात येते. |

**विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती**

जिल्हा परिषदेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांच्या कल्याणासाठी जिल्हा परिषदेने घेतलेल्या विविध योजना व आर्थिक उन्नतीच्या योजना बाबतची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| २२ | २) सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४ ते मे २०१५ या कालावधीत अनुदानित वसतीगृहातील लाभार्थ्यांना दरमहा पालनपोषन अनुदान, अधिक्षकांचे वेतन, वसतीगृह, भाडे, इमारत परिरक्षण अनुदान व भांडी, फर्निचर इत्यादीच्या खरेदीवर किती अनुदान देण्यात आले आहे. त्यापैकी किती रक्कम खर्च करण्यात आली ? | सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षात विमुक्त जाती भटक्या जमातीच्या अनुदानित वसतिगृहाच्या योजनेकरीता खालिलप्रमाणे अनुदान प्राप्त झाले असुन त्या अनुषंगाने खर्च झालेला आहे. |

| अ. क्र. | वर्ष | एकुण प्राप्त अनुदान (SC/ST/ VJNT) | पैकी VJNT करीता प्राप्त अनुदान | त्या अनुषंगाने करणेत आलेला खर्च (रुपये | | | | एकूण खर्च (रुपयं लाखात) | वसतीगृह संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | परिपोषण अनुदान | अधिक्षक, कर्मचारी मानधन | इमारत परिरक्षण अनुदान | भांडी फर्निचर इ. | | |
| १) | २०१२/१३ | ६८६.४८ | १९.९९ | १९.९८ | ० | ० | ० | १९.९८ | ६ |
| २) | २०१३/१४ | ६६१.७१ | ४५.०२ | २२.८६ | २२.१६ | ० | ० | ४५.०१ | ६ |
| ३) | २०१४/१५ | ६९४.०५ | २५.२७ | २५.२७ | २.४१ | ० | ० | २५.२७ | ६ |

वसतिगृहाची इमारत ही संस्थेच्या मालकीची असल्यास इमारत परिरक्षण अनुदान अदा केले जात नाही. इमारत भाडे करारावर असल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग जे भाडे मंजूर करेल त्या भाडयाच्या ७५% भाडे अदा करणेबाबत शासन निर्णयात नमूद करण्यात आलेले आहे. इमारत भाडे याबाबीवर अंदाजपत्रकात दरवर्षी मागणी करणेत येते तथापी सदर बाबींवर तरतूद उपलब्ध न झाल्याने इमारत भाडे थकीत आहे. तसेच सदर वर्षात शासनामार्फत कोणत्या ही नवीन वसतिगृहांना मान्यता दिली गेली नसल्याने भांडी व फर्निचर इत्यादी बाबींवर खर्च झालेला नाही.



**विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती**

जिल्हा परिषदेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोकांच्या कल्याणासाठी जिल्हा परिषदेने घेतलेल्या विविध योजना व आर्थिक उन्नतीच्या योजना बाबतची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| २३ | विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी असलेल्या तांडा वस्ती सुधार व यशवंत ग्रामसमृध्दी योजनाबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. | |

| अ.क्र | आर्थिक वर्ष | प्राप्त तरतुद | झालेला खर्च | तांडा वस्तीची संख्या | तांडा वस्तीचे नांवे वाटप तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१२-१३ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २ | २०१३-१४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ३ | २०१४-१५ | ५०.९९ | ५०.९९ | १० | १)धनगरवस्ती, ता.नांदगांव,३,००,०००/- |
| | | | | | २)प्लॉटतांडा ता.नांदगांव,३,००,०००/- |
| | | | | | ३)पारेकरवाडी ता.नांदगांव, ४,९९,७८९/- |
| | | | | | ४)चंदनपुरी तांडा ता.नांदगांव,४,९९,९९८/- |
| | | | | | ५)वंसतनगरतांडा-१ ता.नांदगांव,४,९९,९९८/- |
| | | | | | ६)वंसतनगरतांडा-२ ता.नांदगांव,४,९९,९९८/- |
| | | | | | ७) हाकेवाडी - ता.नांदगांव,४,९९,९९८/- |
| | | | | | ८) सेवानगर तांडा- ता.नांदगांव,१०,००,०००/- |
| | | | | | ९) अहिल्यादेवी नगर- ता.सिन्नर ४,९९,७८९/- |
| | | | | | १०) अहिल्यादेवी तांडा- ता.सिन्नर ४,९९,७८९/- |
| | | | | एकूण - | ५०,९९,३५९/- |

परिशिष्ट- "दोन"

## जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून साक्षीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती



### विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या बैठकीचे कार्यवृत्ती.

**कार्यालयाचे नावः- सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नाशिक**

| अ.क्र. | सन्मा.विधानसभा सदस्य यांचे नाव | समितीच्या बैठकीचे कार्यवृत्ती प्रश्नावली | कार्यवृत्तानुसार केलेले अनुपालन |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ डी १ | मा.आ.श्री.हरिसिंग राठोड | व्हीजेएनटी तांडा वस्ती योजनेअंतर्गत गेल्या वर्षी जिल्हयाला किती निधी मिळाला होता. | वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेच्या नाशिक जिल्हयातील बृहतआराखडयात समाविष्ट केलेल्या व्हीजेएनटी तांडा वस्त्यांच्या प्राप्त प्रस्तावानुसार रु.५०.९९ लाख इतक्या निधीची मागणी केल्युनसार सदर निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. त्यानुसार नांदगाव तालुक्यातील आठ तांडा वस्त्यांना व सिन्नर तालुक्यातील २ तांडा वस्त्यांना या योजनेतंर्गत व्हीजेएनटी तांडा वस्त्यांची कामे करण्यात आलेली आहेत. |
| २ पान क्र. डी १ | मा. आ. श्री. महादेव जानकर | तांडयामध्ये धनगर इन्क्लुड केले आहेत. आम्हाला काल बरीच गावे दिसून आली | वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेच्या नाशिक जिल्हयातील बृहत आराखडयात दिनांक १९.१२.२००८ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार संबधित गटविकास अधिकारी यांनी पंचायत समितीच्या कनिष्ठ अभियंत्याकडुन आराखडा तयार करण्यात आलेला असुन. सदरच्या बृहत आराखडयात धनगर वस्त्यांचा समावेश संबधित ग्रामपंचायतीच्या ठरावासह घोषित करण्यात आलेला आहे.<br>संबधित गटविकास अधिकार यांच्याकडुन या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाशिक जिल्हयातील बृहत आराखडयास वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेच्या जिल्हास्तरीय समितीने अनुमती दिलेली असुन त्यात धनगर समाजाच्या वस्त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. |
| ३ पान क्र. डी १,२ | मा.आ.श्री.हरिसिंग राठोड | प्रस्ताव केव्हा पाठविला आहे ? यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना चार वर्षापुर्वी शासनाने आणली होती. त्या योजनेनुसार २० लोकांचा एक क्लस्टर विकसित करून वसवायचा आहे. ५००० रुपये प्रति व्यक्ती तरतुद असते. चांगली वस्ती निर्माण | राज्यातील विमुक्त जाती , भटक्या जमाती या कुटुंबाचे राहणीमान उंचावणे, त्यांचे उत्पानाचे स्त्रोत वाढवून त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी यासाठी ग्रामीण भागांमध्ये अश्या कुटुंबांना प्रत्येकी ५ गुंठे जमीन उपलब्ध करून देवून त्यावर त्यांना २६९ चौफु ची घरे बांधून देणे व उर्वरीत जागेवर लाभार्थी कुटुंबांना विविध शासकीय योजनांव्दारे स्वंयरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येते. त्यामध्ये २० लाभार्थ्यांची एक वसाहत निर्माण केली जाते. त्या अनुषंगाने नाशिक जिल्हयातील नांदगाव |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्यासाठी २ ते ५ गुंठे जागा देण्याची तरतुद आहे. | तालुक्यातील मौजे फुलेनगर येथील २० लाभार्थ्यांसाठी सर्वे नं. ३१ मधील १ हेक्टर जागेवर रक्कम रु. १ कोटीचा प्रकल्प मंजुरीचा प्रस्ताव दिनांक २२.१.२०१६ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे. |
| ४ पान क्र.ई-१ | मा.आ.श्री.सुधाकर कोहळे | शासन मान्य अनुदानीत शाळांच रोस्टर पदभरती करावयाचे असेल तर तपासणीसाठी पाठविण्यात येते. मागील किती संस्थांचे रोस्टर तपासणी करण्यात आले. | समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत नाशिक जिल्हयात विजाभज प्राथमिक-१८ व माध्यमिक १० अशी एकुण २८ आश्रमशाळा कार्यरत आहेत. सदर आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती प्रथमतः संस्था स्तरावरुन करण्यात येते व सदर पदास याकार्यालयाकडुन तसेच प्रादेशिक उपायुक्त कार्यालयाकडुन मान्यता दिली जाते. मान्यता देतांना सदर आश्रमशाळेतील मंजुर पद संख्येनुसार मा.मागासवर्ग कक्ष यांचेकडुन रोस्टरची तपासणी करुनच मान्यता देण्यात येते. तसेच १६ ऑक्टोबर २०१२ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील अतिरीक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन झाल्याशिवाय कुठलेही नवीन पदास मान्यता प्रदान करण्यात येवु नये असे निर्देश असल्याने नवीन पदास मान्यता देण्यात आलेली नाही. |
| ५ पान क्र.ई-१ | मा.आ.श्री.सुधाकर कोहळे | एखादी पदभरती प्रक्रिया चुकीची दाखविली जावु शकते, ती व्हॉलीड दाखविण्यात येवु शकते त्यासाठी अचानक भेट देवुन तपासणी करण्यात येते का? | प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेस प्रतिवर्षी कमीत कमी ३ भेटी देवुन तपासणी करण्यात येते. सदर भेटीदरम्यान विजाभज विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा तसेच शालेय विभाग व वसतीगृह विभागाची दफ्तर तपासणी करण्यात येते. तसेच संस्थेने नियुक्त केलेल्या कर्मचारी भरतीचे रोस्टर मा.मागासवर्ग कक्ष यांचेकडुन तपासुन घेतले आहे किंवा नाही याबाबत खात्री करण्यात येते. |

**सहाय्यक आयुक्त,**
**समाज कल्याण नाशिक**



परिशिष्ट- "तीन"

## समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

## पहिली बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २४ जून, २०१५ रोजी जिल्हा परिषद, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स.तथा समिती प्रमुख
(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(४) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.
(५) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.
(६) श्री. महादेव जानकर, वि.प.स.
(७) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.
(८) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(२) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद, नाशिक :**

(१) श्री. सुखदेव बनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. सुनिल गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. संदीप माळोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(४) श्री. आर. एस. मोगल, शिक्षण अधिकारी (प्राथमिक)
(५) श्री. एस. बी. वळवी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी
(६) श्री. रणधीर सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत)
(७) श्री. बी. जे. सोनकांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(८) श्री. उद्धव खंदारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण)
(९) श्री. नवनाथ औताडे, शिक्षण अधिकारी (माध्यमिक)

**विभागीय अधिकारी :**

(१) श्रीमती वंदना कोचुरे, सहायक आयक्त,समाज कल्याण
(२) श्री. प्रकाश वाघमोडे, सहायक आयुक्त (मावक)

सदर बैठकीत समितीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली.



## दुसरी बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(४) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.
(५) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.
(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(७) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.
(८) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. राजेश तारवी, उप सचिव

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. उज्ज्वल ऊके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
(२) श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
(३) श्री. नंदकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
(४) श्री. मिलींद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., नाशिक
(५) श्री. औताडे, शिक्षणाधिकारी, जि.प., नाशिक
(६) श्री. प्रविण अहिरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प., नाशिक
(७) श्री. सोनकांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प., नाशिक

**विभागीय अधिकारी :**

(१) श्रीमती वंदना कोचुरे, सहा.आयुक्त, समाजकल्याण विभाग
(२) श्री. प्रकाश वाघमोडे, सहायक आयुक्त (मावक) समाजकल्याण विभाग

सदर बैठकीत समितीने प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग व प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग व इतर संबधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

**तिसरी बैठक**

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीत खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(३) श्री. महेश चौघुले, वि.स.स.
(४) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.
(५) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.
(६) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(७) श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(३) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारूप अहवालावर विचार करून काही दुरुस्त्यांसह तो संमत केला.



**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**